

# पुणे महानगरपालिका
# सन २०१९-२०चे अंदाजपत्रक



# पुणे- दृष्टीक्षेपातील




भारतातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले **आठवे** शहर

महाराष्ट्रातील **दुसरे** सर्वात मोठे शहर

पुणे महानगरपालिका हद्दीतील क्षेत्र (including new merged 11 villages) **- 332 Sq. Km**

लोकसंख्या (as on 2018) – **40 lakh+** (without Floating Population)

झोन **- 5,** वॉर्डस **- 15** आणि प्रभाग **- 41**

महाविद्यालये /संस्था **- 811 “Oxford of the East”**

साक्षरतेची सरासरी – **90 %**

घरांची संख्या – **8.81 lakh**

झोपडपट्ट्यांची संख्या – **564 (353** Notified**)**

नदीची लांबी - **44 km** (मुळा ,मुठा,मुळा – मुठा)

वाहनांची संख्या (2018) - **36.27 lakh**
(2W - 27.03 lakh), (4W – 6.74 lakh)

GDP of Pune city (5th highest in country) –
**69 billion USD**

# भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधा

## पाणीपुरवठा (WTP) - 7 No's

- पाणीपुरवठा - **1300 MLD**
- पाइपलाइनची लांबी - **2600 Km**

## मल:निसारण (STP) - 10 No's

- मल:निसारण नेटवर्कची लांबी - **2165 Km**
- **Waste Water generation -744 MLD**
- **STP Capacity – 567 MLD**

## घनकचरा व्यवस्थापन (SWM)

- कचरा निर्मिती - **1952 TPD**
- घरोघरी कचरा गोळा करणे - **100%**
- ओल्या व सुक्या कचऱ्याचे विलगीकरण - **80%**
- **Waste Segregation - 1562 TPD**
- कचरा प्रक्रिया - **1171 TPD**




**रस्त्यांची लांबी - 1400 Km**

**पथ दिवे - 1.70 lakh**

**मनपा शाळा** (प्राथमिक आणि माध्यमिक) - **310**

पीएमसी हॉस्पिटल / ओपीडी - **69 No's**

**उद्यान – 191 No's**

**सायकल मार्गाची एकूण लांबी - 60 Km**

**Share of Public Transport -12.2 %**

**सार्वजनिक बसेस संख्या** (On Road) **-1500**

**(PMPML -1050, On contract - 450)**

**PMPML Bus terminals /Depots - 10**

# पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सन २०१९-२० चा आराखडा तयार करताना विचारात घेण्यात आलेले सिद्धांत(१/२)

"संकल्प ते सिध्दी" चळवळीसाठी विशिष्ट योजनांवर प्राधान्याने लक्ष्य केंद्रीत करणे.

पुणे शहर हे "राहण्यायोग्य सर्वोत्तम शहर" म्हणून ओळखले जात असल्याने, पुणे महानगरपालिके मार्फत शहरातील पायाभूत सोयीसुविधा विकसीत करणे.

विविध महत्वकांक्षी योजनांची अंमलबजावणी करतांना त्यास अनुसरून माहिती व तंत्रज्ञान, e-governance चा वापर करणे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रात सर्वसमावेशक विकासाची खात्री करणे .

# पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सन २०१९-२० चा आराखडा तयार करताना विचारात घेण्यात आलेले सिद्धांत (२/२)

पुणे शहराच्या सामाजिक व आर्थिक समालोचन प्रकाशनातील सांख्यिकीचा आधार घेऊन प्राधान्य क्रमाप्रमाणे विविध क्षेत्रांचा विकास करणे.

शाश्वत  विकासांची ध्येये (SDG) यांच्या आधारावर योजनांचा अग्रक्रम निश्चित करणे

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य विनियोगावर भर देणे.

भुगर्भ पाणीसाठ्यात वाढीच्या उपाययोजना करणे.

# अंदाजपत्रक सन २०१९-२० चा आराखड्यात उचलण्यात आलेले नविन पाऊल

प्रमुख योजनांचा फलनिष्पतीबाबत त्रयस्थ संस्था मार्फत मूल्यमापन करणे.

मनपा मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये पारदर्शकता आणणेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

कामांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी Impact Analysis व Social Audit या द्वारे जनसहभाग वाढविणे.

वित्तीय शिस्त येण्याच्या दृष्टिकोनातून, प्रशासकीय दृष्ट्या वेगवगळी पाउले उचलण्यात येणार आहे.

पुणे मनपाची आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि क्रेडिट रेटिंगमध्ये सुधार करण्याच्या दृष्टीने उत्पन्न वाढविण्यावर भर देणे.

# पुणे महानगरपालिकेचे सन २०१९-२० अंदाजपत्रक ठरवितांना प्रामुख्याने भर देण्यात आलेल्या ठळक बाबी (१/५)

शहरातील वाहतूक गतिमान होण्यासाठी रिंगरोड सारखे उच्च क्षमता जलद गतीमार्ग (**हाय कॅपिसिटी मास ट्रान्झिट रूट- एच. सी. एम. टी. आर.**) प्रकल्प प्राथमिकतेवर राबविणे.



सन 2030 पर्यंत सार्वजनिक वाहतूक मध्ये 100% इलेक्ट्रिक बसेस, या केंद्र शासनाच्या संकल्पनेवरून प्रदूषण कमी होण्यासाठी पीएमपीएमएल मार्फत ५०० ई- बसेस आधारभूत सुविधांसह टप्प्या-टप्प्याने पुरविणे.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी ई - बसेस व्यतिरिक्त यावर्षात जवळ जवळ ८५० CNG AC बसेस नागरिकांच्या सोयी साठी उपलब्ध करणे.



# पुणे महानगरपालिकेचे सन २०१९-२० अंदाजपत्रक ठरवितांना प्रामुख्याने भर देण्यात आलेल्या ठळक बाबी (२/५)

बी.आर.टी.एस मार्फत नागरिकांना उच्च गुणवत्तेची जलद, आरामदायी व खर्च प्रभावी सेवा उपलब्ध करणे.



रस्त्यावरील वाहतूक कोंडी व प्रदूषण कमी होणेस मदत होण्यासाठी शहरी एकात्मिक सायकल योजनेला गती देणे.



अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन व पेडेस्ट्रियन पॉलिसी नुसार पुणे मनपा हद्दीतील सुमारे १०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे विकसन करणे.



# पुणे महानगरपालिकेचे सन २०१९-२० अंदाजपत्रक ठरवितांना प्रामुख्याने भर देण्यात आलेल्या ठळक बाबी (३/५)

शहराची वाहतूक समस्या सोडविण्यासाठी सार्वजनिक जलद परिवहन म्हणून पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पास गती देणे.



“सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे’ या संकल्पनेच्या अनुषगाने प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पुणे शहरातील पात्र लाभार्थ्यांना परवडणाऱ्या घरांची निर्मितीला गती देणे.

त्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत परवडणारी घरे,सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील प्रकल्प आणि कर्ज सलग्न व्याज अनुदान(CLSS) या माध्यमातून अंदाजे २१००० घरकुलांची निर्मिती या वर्षात करण्याचे नियोजन आहे.



# पुणे महानगरपालिकेचे सन २०१९-२० अंदाजपत्रक ठरवितांना प्रामुख्याने भर देण्यात आलेल्या ठळक बाबी (४/५)

सुनियोजित व समान पाणीपुरवठा व्यवस्था करणे.



संपूर्ण मैलापाणी शुद्धीकरण करण्यासाठी राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेला पुणर्त्वासिवर आणणे



“Integrate River in the life of the Pune City’ या उद्देशावर नदीकाठ विकसन प्रकल्प राबविणे.




# पुणे महानगरपालिकेचे सन २०१९-२० अंदाजपत्रक ठरवितांना प्रामुख्याने भर देण्यात आलेल्या ठळक बाबी (५/५)

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नागरिकांचा सहभाग घेऊन स्वच्छ पुणे मोहीम राबविणे.



नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांना पायाभूत सुविधा पुरविणे.



# पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आगामी वर्षात निश्चित केलेल्या उपाय योजना (१/४)

पुणे महानगरपालिका हद्दीतील थकीत असलेल्या मिळकतधारकांकडून थकीत मिळकत कर वसूल करणेवर लक्ष केंद्रित करणे.

कर आकारणी न झालेल्या मिळकती शोधून कर आकारणीच्या जाळयात आणून मिळकत कराचे उत्पन्न वाढविणे.

यापूर्वी कर आकारणी झालेल्या मिळकतीमधील त्रुटी, GIS च्या माध्यमातून अद्ययावत करून मिळकत कराची वसुली करणे.

नवीन समाविष्ट ११ गावांमधील सुमारे १.४२ लक्ष मिळकतींची आकारणी मनपा धोरणाप्रमाणे करून त्यांना बिले देणे, तसेच आकारणी न झालेल्या मिळकतींची कर आकारणी करणे व उत्पन्न वाढविणे.

# पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आगामी वर्षात निश्चित केलेल्या उपाय योजना(२/४)

ज्या निवासी मिळकतीचे क्षेत्र १००० चौ.फुटापर्यंत आहे, अशा मिळकतीना यापूर्वी दुप्पट/तीनपट कर आकारणी करण्यात येत होती. आता मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर मागील वर्षाची थकबाकी वसूल करून १.४.२०१९ पासून एकपट कर आकारणी करण्यात येणार आहे.

ज्या निवासी मिळकतीचे क्षेत्र १००० चौ.फुटापेक्षा जास्त आहे, अशा मिळकतीना यापूर्वी तीनपट कर आकारणी करण्यात येत होती. आता मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर मागील वर्षाची थकबाकी वसूल करून १.४.२०१९ पासून दीडपट कर आकारणी करण्यात येणार आहे.

पुणे महानगरपालिकातील थकीत पाणीपट्टीवर विशिष्ट भर देऊन थकीत पाणीपट्टी वसूल करणे.

# पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आगामी वर्षात निश्चित केलेल्या उपाय योजना(३/४)

पुणे मनपाच्या स्वत:च्या मालकीचे मिळकती उदा: ओपन स्पेस, ॲमॅनिटी स्पेस, सदनिका, गाळे यांचे मॅपिंग /सर्व्हेक्षण करून योग्य  वापराच्या माध्यमातून उत्पन्नात वाढ करणे.

भाडेतत्वावर देण्यात आलेल्या सर्व मिळकतींचा आढावा घेऊन अनाधिकृत हस्तांतरित प्रकरणामध्ये योग्य तडजोड शुल्क आकारून उत्पन्नात वाढ करणे.

आकाश चिन्ह परवानाकडील कामाचे आधुनिकीकरण करून,शहराला विद्रुपीकरणातून मुक्त करणे व मनपा च्या उत्पनात भर घालणे.

# पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी आगामी वर्षात निश्चित केलेल्या उपाय योजना (४/४)

पुणे मनपा हद्दीतील झोपडीधारकांना संगणकीय पद्धतीने सेवा शुल्क आणि पाणीपट्टी बिले देण्याकरता झो.नि.पु विभागामार्फत संगणकीय प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. त्यानुसार या वित्तीय वर्षात क्षेत्रिय कार्यालयामार्फत बिले पाठवून सेवा शुल्क वसूल करणे.

“Money saved is Money Earned” या संकल्पनेवर अंदाजपत्रकातील निधीचा वापर करताना योग्य विचार विनिमय व तपासणी करून योग्य पद्धतीने निधी खर्च करणे.

वित्तीय शिस्त येण्याच्या दृष्टीकोनातून प्रशासकीय दृष्ट्या वेगवेगळी पाऊले उचलण्यात येणार आहेत.










# पुणे महानगरपालिके मार्फत पूर्णत्वास/सुरु/ प्रस्तावित असलेले महत्वाचे प्रकल्प









# सुनियोजित व समान पाणीपुरवठा व्यवस्था(१/२)


(भांडवली तरतूद र.रु.५१३.८३ कोटी + महसुली तरतूद र.रु.३७४.४७ कोटी = ८८८.३० कोटी)

पुणे शहरास २४X७ पाणीपुरवठा योजने अंतर्गत (अंदाजे १८०० कि.मी.लांबीच्या विविध व्यासाच्या जलवाहिन्या टाकणे, सुमारे ३,१५,००० AMR पध्दतीचे मीटर बसविणे,८1 साठवण टाक्या बांधण्याचे नियोजन) र.रू.२३०७ कोटीच्या ६ पॅकेजमध्ये निविदा मागवून कामे सूरु आहेत. त्यासाठी अंदाजे एकूण र.रु.५०० कोटी इतका खर्च या वित्तीय वर्षात होईल.

सद्यपरीस्थितीमध्ये संपुर्ण सर्वेक्षणाचे काम पुर्ण, ५०% डिझाईनचे काम पुर्ण ,३५० कि.मी. लांबींची जलवाहिनी टाकण्याचे काम या वर्षात पूर्ण होईल.

सर्व व्यापारी नळजोडावर ४०,००० AMR Meter व घरगुती नळजोडांवर ५०,००० AMR मीटर एकूण ९०००० मीटर बसविण्याचे काम या वर्षात पूर्ण होईल.

# सुनियोजित व समान पाणीपुरवठा व्यवस्था(२/२)



अमृत अभियान अतंर्गत एकूण ८१ टाक्यांचे काम या वर्षात पूर्ण होईल त्यापैकी ६० साठवण टाक्या बांधण्याचे काम सुरू असून उर्वरित २१ टाक्याचे काम हाती घेण्यात येईल.

पुणे शहराच्या पूर्व भागात असलेल्या वडगांव शेरी, खराडी, चंदननगर इत्यादी भागासाठी भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याच्या कामाच्या एकुण ०६ घटकांची कामे चालू असून, सदरची योजना माहे ओक्टोंबर २०१९ पर्यंत पूर्ण करून कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

# राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायका प्रकल्प)(१/२)

(तरतूद र.रु.८० कोटी)

सन २०२७ पर्यंतच्या लोकसंख्या वाढीनुसार निर्माण होणारे संपुर्ण मैलापाणी शुध्दीकरण करणेसाठी राष्ट्रीय नदी संवर्धन कार्यक्रम अंतर्गत जपान सरकारच्या (जायका) अर्थसहाय्याने र.रु.९९०.२६ कोटीची योजना कार्यान्वित.





सदर योजनेमध्ये प्रामुख्याने ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारणे, सुमारे ११३ किमी लांबीच्या मलवाहिन्या विकसीत करणे, जीआयएस/एमआयएस, स्काडा यंत्रणा उभारणे, कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक उभारणे इ. एकूण १३ पॅकेजेसच्या कामांचा समावेश आहे.






# राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायका प्रकल्प)(२/२)

सदर प्रकल्पामधील पॅकेज क्र.१ अंतर्गत बाणेर-बालेवाडी भागामध्ये मलवाहिन्या टाकणेचे (सुमारे ३२ किमी.) उर्वरीत काम पुर्ण करण्यात येणार आहे.



सदर प्रकल्पामधील ६ मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे उभारण्याचा समावेश असलेल्या पॅकेज क्र. ४,५,६ व ८ (एकूण क्षमता २७७ एमएलडी) प्रकल्पाचे १०% काम आणि मुख्य मलवाहिन्या (७०किमी. लांबी) विकसित करण्याच्या पॅकेज क्र. २ व ३ मधील प्रकल्पाचे २० कि.मी चे काम पुढील वर्षात पूर्ण होईल. **त्यासाठी अंदाजे एकूण र.रु.१००  कोटी इतका खर्च या वित्तीय वर्षात होईल**



# मलनिःसारण(१/२)

(भांडवली तरतूद र.रु.१९९.५५ कोटी + महसुली तरतूद र.रु.१४२.०१ कोटी = ३४१.५६ कोटी)




मे.राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या आदेशानुसार नदी व नाल्याचे प्रदुषण तपासण्यासाठी आय.आय.टी. मुंबई यांची नियुक्ती केली आहे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नदी व नाल्यामधून उघड्यावर वाहणारे मैलापाणी नजीकच्या मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी नाल्यामध्ये मलवाहिन्यांची कनेक्टिव्हिटी करणे, ४५० मिमी. ते १६०० मिमी. व्यासाच्या सुमारे ५१ किमी. लांबीच्या मलवाहिन्याचे काम या वित्तीय वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे .

# मलनिःसारण(२/२)

मौजे भिलारेवाडी, मांगडेवाडी व गुजर-निंबाळकरवाडी या ग्रामपंचायत हद्दीमध्ये मुख्य मलवाहिन्या विकसीत केल्यामुळे नानासाहेब पेशवे (कात्रज) तलावाचे मैलापाण्यामुळे होणारे प्रदुषण रोखणे शक्य होईल.

पुणे मनपा हद्दीतील व नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसाठी मैलापाणी वहन व्यवस्थेबाबत मास्टर प्लॅन तयार करण्याचे काम या वर्षात पूर्ण होईल.

पुणे शहरातील १५ पैकी १२ ड्रेनेज डिस्ट्रीक्ट (झोन) मधील अस्तित्वातील मलवाहिन्यांचे सर्वेक्षण आणि हायड्रॉलिक मॉडेलिंगचे काम या वर्षात पूर्ण होईल.



# स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्प

**(तरतूद र.रु.४० कोटी)**





- पुणे स्टॉर्म वॉटर मास्टर प्लॅनमध्ये एकूण २३ बेसिनचा समावेश आहे.
- या आधारे ४ बेसिनचे र.रु.१७५.५० कोटी चे काम केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत पूर्ण.

-त्यानंतर २०१५ च्या जोरदार पावसामुळे वारंवार निर्माण होणारी पूर स्थान चीन्हाकिंत करून उर्वरित कामासाठी ४ टप्पे नियोजित करण्यात आले.

- त्याप्रमाणे टप्पा १.र.रु.११७ कोटीचे व टप्पा २ र.रु.१०० कोटीचे काम पूर्ण झाले असून , टप्पा ३ चे कामे प्रगतीपथावर असून या वित्तीय वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

# नदीसुधारणा प्रकल्प(१/२)

(तरतूद र.रु.८०.२७ कोटी)




पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागांच्या हद्दीतून वाहणा-या अंदाजे ४४ कि.मी. लांबीचा मुळा, मुठा, व मुळा-मुठा नदीकाठ सुशोभिकरण करणे.

विकसनाबाबत नद्यांचे जलशास्त्रीय सर्वेक्षण करणे.

प्रकल्पाचे नकाशे तयार करणे, डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे.

तसेच संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय विभागाकडील मान्यता घेणे.

# नदीसुधारणा प्रकल्प(२/२)



महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व नदीशी संलग्न असलेल्या विविध विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे


नदीकाठ विकसन प्रकल्पास नागरीकांचा  अभिप्राय घेणेची प्रक्रिया पूर्ण करणे.

अंतिम प्रकल्प अहवाल तयार करणे.

नदीशी संलग्न शासनाच्या एकूण सात संस्था मिळून एस.पी.व्ही.कंपनी स्थापन करणे.

# घनकचरा व्यवस्थापन(१/४)

(भांडवली तरतूद र.रु.८६.३६ कोटी + महसुली तरतूद र.रु.४६०.५४ कोटी = ५४६.९० कोटी)





पुणे शहराला  पूर्णतः कचरा मुक्त करणे आणि दैनंदिन निर्मित होणाऱ्या कचऱ्याला १००% शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेची क्षमता विकसीत करणे हे २०१९-२० चे उद्दिष्ट आहे.

०१ जानेवारी २०२० नंतर प्रक्रीये शिवाय कुठलाही कचरा डंम्पींग ग्राउंडवर जाणार नाही यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आलेले आहे.

घरोघरी कचरागोळा करणेची क्षमता १००% पर्यंत नेणे तसेच १००% कचरा विलगीकरण क्षमता विकसीत करण्याचे नियोजित आहे.

# घनकचरा व्यवस्थापन(२/४)





घरगुती आणि व्यापारी कचराव्यवस्थापनाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करणेवर भर.

नागरिकांच्या समाधानासाठी योग्य स्तरावर दर्जेदार काम करणे.

शासनाच्या घनकचरा (व्यवस्थापन हताळणी) नियम २०१६ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाने घनकचरा व्यवस्थापणासाठी होणाऱ्या एकूण खर्चासाठी तुलनेत वापरकर्ता शुल्क (User Charges) आकारून दर्जेदार सेवादेणे प्रस्तावित आहे.

# घनकचरा व्यवस्थापन(३/४ )




उरुळी फुरुसुगी कचरा डेपो येथे १००० मे.टन दैनंदिन क्षमतेचा बायोमायनिंग प्रकल्पाला पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे.

रामटेकडी हडपसर येथे कचऱ्यापासून वीज निर्मितीचा ७५० मे.टनचा प्रकल्प डिसेंबर २०१९ पर्यंत संचलीत करणे.

केशवनगर, आंबेगाव, लोहगांव प्रकल्पामार्फत प्रत्येकी १०० मे.टन असा एकूण ३०० मे.टन दैनंदिन व हडपसर -रामटेकडी प्रकल्पामार्फत २०० मे.टन व उरळी प्रकल्पामार्फत २०० मे.टन असे **एकूण ७०० मे.टन** दैनंदिन कच-याचे यांत्रिकी पध्दतीने वर्गीकरण करण्यात येणार आहे.

# घनकचरा व्यवस्थापन(४/४ )


बिबवेवाडी  प्रकल्पामार्फत ५० मे.टन दैनंदिन कचऱ्याचे यांत्रिकी पध्दतीने प्रक्रिया करण्यात येणार आहे.

विकेंद्रीकृत पध्दतीने वॉर्ड निहाय लहान प्रकल्पांना हाती घेणे.

देवाची उरूळी येथे १० एकर जागेवर शास्त्रोक्त पद्धतीने भू-भराव करणे.

आय.सी.टी (ICT) बेस मॉनिटरिंग करणे.

# HIGH Capacity Mass Transit Route (H.C.M.T.R) (तरतूद र.रु.२११कोटी)




एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३६ कि.मी.असून रूंदी २४ मी. आहे.

सदर प्रकल्पाची प्रस्तावित अलाइनमेन्ट पूर्णतः उन्नत स्वरूपाची असून त्यावर एकूण ६ मार्गिका प्रस्तावित आहेत.

यामध्ये २ मार्गिका बी. आर. टी. साठी व उर्वरित मार्गिका खाजगी वाहनांसाठी आरक्षित आहेत.

सदर प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूक करून सदर प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी विविध Financial Options देवून प्रकल्प खर्च उभारण्याचे काम करून या वित्तीय वर्षात गती देण्यात येईल.


# बी.आर.टी.एस.

संगमवाडी ते विश्रांतवाडी व नगररस्ता या रस्त्यांवर एकूण सुमारे १६ कि.मी.लांबीकरीता बी.आर.टी.एस. योजना कार्यान्वित करण्यात आली असून सदर रस्त्यांवर बी.आर.टी. बसेसचे संचलन सुरू आहे.

विद्यापीठ चौक ते राजीव गांधी पूल दरम्यानचे साधारणपणे ३.०० कि.मी.लांबीचे काम या वित्तीय वर्षात पूर्ण करणे.

पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिस ब्रिज, बोपोडी या अंदाजे ५.७० कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी पाटील इस्टेट जंक्शन ते रेंजहिल चौक दरम्यान २.२० कि.मी.लांबीचे काम या वित्तीय वर्षात पूर्ण करणे.

सातारा रस्ता स्वारगेट जंक्शन ते कात्रज दरम्यान सुमारे ५.५० कि.मी.लांबीचे  काम या वित्तीय वर्षात पूर्ण करणे.



# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

(तरतूद र.रु.२७३.०४ कोटी)

५०० ई-बसेस टप्याटप्याने व Gross Cost Contract तत्वावर आणि ४४० सी.एन.जी. एसी बसेस घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाने ४०० नवीन स्वमालकीच्या एसी सीएनजी बसेस घेण्याबाबत कार्यवाही सुरू केली असून लवकरच बसेस दाखल होत आहेत.

पी.एम.पी.एम.एल च्या विविध डेपोमध्ये विकसनाची कामे करणे.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडची वित्तीय परिस्थितीमध्ये सुधारणा करणेसाठी Non Fare revenue मध्ये वाढ करण्याच्या उपाय योजनांवर भर देणे.

पी.एम.पी.एम.एल च्या Business Plan तयार करून त्याचे अनुरूप महामंडळाचे एकंदरीत कार्य कुशलतेमधील वाढीवर भर देणे.


# शहरी एकात्मिक सायकल योजना


(तरतूद र.रु.२४ कोटी)

पुणे शहरामध्ये एकंदर ८२४ कि.मी. सायकल ट्रॅक टप्प्या टप्प्याने पुढील पाच वर्षात करण्याचे काम हाती घेण्यात येणार असून यासाठी अंदाजे र.रु.३३५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सार्वजनिक सायकल योजनेच्या आराखड्याप्रमाणे रस्त्यावरील वाहतूक कोंडी व प्रदूषण कमी करण्यासाठी पुणे शहरात विविध ठिकाणी पब्लिक बायसिकल शेअरींग सिस्टीम अंतर्गत सुमारे 6 हजार सायकली उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

याअंतर्गत कॅनॉलच्या कडेने १८.७ कि.मी. सायकल ट्रॅक विकसित करण्यासाठी पाटबंधारे खात्याकडून परवानगी घेण्याची प्रक्रिया सुरु.






# पथ विभाग (1/2)

**(भांडवली तरतूद र.रु.५०३.०० कोटी + महसुली तरतूद र.रु.१९६.७६ कोटी = ६९९.७६ कोटी)**

पुणे स्ट्रीट प्रोग्राम अंतर्गत पुणे मनपा हद्दीतील सुमारे १०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन व पेडेस्ट्रियन पॉलिसी नुसार विकसन करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी जंगली महाराज रस्त्याचे (२ कि.मी.लांबीचे) काम पूर्ण झाले असून, काँग्रेस भवन रस्ता, फर्ग्युसन कॉलेज रस्ता, बिबवेवाडी रस्ता, लक्ष्मी रस्ता, इ.चे काम प्रगतीपथावर आहे.

शिवणे ते खराडी रस्ता - शहरातील वाहतूकीवरील ताण कमी करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून शिवणे ते खराडी दरम्यान नदीकाठावर दर्शविण्यात आलेल्या डी.पी.रस्त्याचे काम, शिवणे ते म्हात्रे पूल फेज-१ लांबी ६ कि.मी. व संगमवाडी ते खराडी फेज-३ लांबी ११.५० कि.मी. असे एकूण १७.५० कि.मी. लांबीचे काम प्रगतीपथावर असून त्या कामाला गती देण्यात येईल.

# पथ विभाग(2/2)



कात्रज-कोंढवा रस्ता - राजस सोसायटी ते खडीमशिन चौक दरम्यान सुमारे ३.५ कि.मी. लांबीच्या व ८४ मी. रूंदीच्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून यावर्षातच्या नियोजनानुसार केले जाईल.

पुणे म.न.पा. अंतर्गत रोड सेफ्टी अहवालानुसार सुमारे १०० कि.मी.लांबीच्या महत्वाच्या रस्त्यांचे विकसन करणे.

पुणे मनपा हद्दीतील विकसीत केलेले एकूण सुमारे १४०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची रोड अ‍ॅसेट मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर करून त्यांचे दुरुस्तीचे काम या वर्षात करणे.

पुणे मनपा हद्दीत नव्याने समावेश झालेल्या ११ गावांमध्ये रस्त्याच्या कामावर भर देण्यात येईल.

# वाहतूक नियोजन व प्रकल्प (१/६)

**(भांडवली तरतूद र.रु. २५२.०९ कोटी + महसुली तरतूद र.रु.११.०० कोटी = २६३.०९ कोटी)**

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधण्याचे काम पूर्ण करून रस्ता खुला करण्यात आला आहे.



मुंढवा येथील पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर २४ मी.एच.सी.एम.टी.आर. साठी रेल्वे ओलांडण्या साठी उड्डाणपूल उभारण्यात आला आहे.



डेक्कन कॉलेज रोड येरवडा येथे कॉलेजचे गेट समोर पादचारी उड्डाणपुल बांधण्याचे काम पूर्ण.



# वाहतूक नियोजन व प्रकल्प (२/६)

रामवाडी भुयारी मार्गांचे दोन्ही बाजूने वाहतूक सुरु करण्याचे उर्वरीत काम पूर्ण .



हॅरिस पुलालगत नवीन पुल बांधणे - पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपाकडून संयुक्तपणे पुणे - मुंबई रस्त्यावर बोपोडी येथे जुन्या पुलावरील वाहतूक कमी होवून नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी पुलाचे बांधकाम पूर्ण.



डेंगळे पुलास नविन समांतर पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.



# वाहतूक नियोजन व प्रकल्प (३/६)

पुणे कॅन्टोनमेंटकडून कोंढव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर लुल्लानगर चौकात उडडणपूल बांधण्याचे काम या वित्तीय वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.



मुंढवा येथे मुळा मुठा नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती पूर्ण करणे.




बालेवाडी पुलाचे, हॅरिस पुलाचे काम पुणे व पिंपरी चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रगतीपथावर आहे.




सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक उड्डाणपुल बांधण्याचे काम प्रस्तावित आहे.

# वाहतूक नियोजन व प्रकल्प (४/६)



येरवडा गोल्फ क्लब चौक येथे उड्डाणपुल बांधणे.

जुन्या पूलांची दुरूस्ती करणे - स्ट्रक्चरल ऑडीट करणेत आलेल्या १८ पूलांव्यतिरीक्त २० वर्षापेक्षा जुन्या आणखी १२ पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टनुसार आवश्यक त्या दुरूस्त्या करणे.

वडगावशेरी येथे ८७ दुचाकी व ९० चारचाकी पार्किंगची व्यवस्था करण्यासाठी इमारत बांधण्याचे काम पूर्ण करणे.

हडपसर व रामटेकडी येथे हलक्या वाहनांकरीता भुयारी मार्गाचे बांधकाम पूर्ण करणे.

# वाहतूक नियोजन व प्रकल्प (५/६)

राजाराम पूल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझ्झाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन  प्लाझ्झा  विकसित करुन सुशोभिकरण करणे - पेडेस्ट्रीयन प्लाझ्झाला बेंचेस, पादचारी मार्ग, झाडे व रोपे, योगासने व प्राणायाम याकरीता मोकळी जागा इ. ची व्यवस्था करण्यात येणार आहे.


राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांचे एकात्मिक विकसन करणे.

पुणे शहरातील घोरपडी येथे पुणे मिरज रेल्वे लाईन व पुणे सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंगवर उडडणपूल बांधणे.

बोपोडी चौक, पुणे मुंबई रस्ता येथे भुयारी वाहन मार्ग व पादचारी मार्ग बांधणे.

औंध सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने पूल बांधणे .

# वाहतूक नियोजन व प्रकल्प(६/६)



नळस्टॉप चौकात उडडणपूल बांधणे – “वनाज ते रामवाडी' या मेट्रो मार्गिकेशी नळस्टॉप चौकातील नियोजीत उड्डाणपूल एकसंध (एकत्रितरीत्या) होणे गरजेचे असल्याने त्याबाबतचा संपूर्ण आराखडा , डिझाईन व बांधकाम महाराष्ट्र मेट्रोरेल कॉर्पोरेशन लि. यांचे मार्फत करणे प्रस्तावित आहे.

कल्याणीनगर ते कोरेगाव पार्क जोडणाऱ्या (एच.एच. आगाखान ब्रीज) पूलाचे रुंदीकरण करणे.

मुंबई – बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर पाषाण - सूस येथे उड्डाणपूल बांधणे.

सिंहगड रोड धायरीफाटा येथे Y जंक्शन पूल बांधणे प्रस्तावित आहे .

# पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प

(तरतूद र.रु.८ कोटी)

नागरीकांचा वैयक्तिक वाहन वापर कमी करणेसाठी पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पातील मार्गिका क्र. १ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट  व मार्गिका क्र. २ वनाझ ते रामवाडी या प्रस्तावित मार्गांचे काम प्रगतीपथावर

स्वारगेट ते कात्रज व वनाझ ते चांदणी चौक (शिवसृष्टी) पर्यंतच्या विस्तारीत मेट्रो मार्गाचा डिपीआर महामेट्रो मार्फत तयार करण्याचे काम सुरु आहे.

सुलभ वाहतुकीकरीता पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम महामेट्रोमार्फत सुरु असून त्याकरीता पुणे महानगरपालिकेचा हिस्सा देण्यात येणार आहे.








# माहिती व तंत्रज्ञान(१/३)

(तरतूद र.रु.३८.१८ कोटी)

**PMC CARE 2.0 -** सर्व ऑनलाईन संगणक प्रणाली एकाच प्रणालीमधून नागरीकांना उपलब्ध करणेसाठी तसेच नागरिकांचा प्रशासनामध्ये सहभाग वाढविण्यासाठी PMC CARE 2.0 (Citizen Assistance Response Engagement) मध्ये अपग्रेड केले.

विविध विभागांची नागरीकाभिमुख माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र सोशल मिडिया कक्षद्वारे सोशल माध्यमांचा प्रभावी वापर करणे.

डीबीटी - विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभधारकांसाठी Direct Benefit Transfer प्रणाली विकसित करुन आत्तापर्यंत नागरीकांना विविध योजनांतर्गत र.रु. ४१.७५ कोटी (मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना र. रु. ३५.१३ कोटी व पुणे मनपा सेवकांना र. रु. ६.६२ कोटी) Direct Benefit Transfer च्या माध्यामातून थेट बॅंकेत जमा.

# माहिती व तंत्रज्ञान(२/३)

**OPEN DATA** - पुणेकर नागरीक, शास्त्रज्ञ, विविध संस्था, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ, इंजिनिअर्स यांना शहरातील विविध शासकीय विभागांची तपशीलवार माहिती उपलब्ध होणेकरीता आंतरराष्ट्रीय स्तरानुसार ओपन डेटा पोर्टल (opendata.punecorporation.org) विकसित केले.

नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर -पुणे महानगरपालिकेची मुख्य इमारत, विविध क्षेत्रिय कार्यालये व संपर्क कार्यालयांमधील नेटवर्कचे अपग्रेडेशन काम चालू असून सर्व कार्यालयांमधील Network Infrastructure अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत अद्ययावत करण्यात येत आहे.

डिजीटल लिटरसी सेंटर्स – नागरीकांना संगणक साक्षर करण्यासाठी १० ठिकाणी डिजीटल लिटरसी सेंटर्स प्रस्तावित आहे.

# माहिती व तंत्रज्ञान(३/३)

लक्ष्य प्रकल्प- केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण उपक्रमांतर्गत पुणे महानगरपालिकेचे अधिकारी दररोज करत असलेल्या प्रभागनिहाय स्वच्छतेविषयी सर्व्हेद्वारे सद्यस्थितीतील माहिती संकलित करण्यासाठी “पुणे लक्ष्य मोबाईल अॅप” विकसीत केले.

सर्व विभागांची माहिती अद्ययावत ऑनलाईन डॅशबोर्डच्या माध्यमातून विकसित करणे प्रस्तावित आहे .

नगरसचिव विभाग दस्तावेज स्कॅनिंग प्रस्तावित.

Enterprise Resource Planning (ERP) - विविध विभागांकडील संगणकप्रणाली मुख्य लेखा व वित्त विभागाकडील संगणकप्रणालीशी जोडणे करीता व पुणे मनपाच्या विविध विभागांकडील होणाऱ्या आर्थिक व्यवहारांची माहिती एकत्रितरीत्या संकलित व सुरक्षित ठेवण्यासाठी Enterprise Resource Planning (ERP) प्रकल्प प्रस्तावित.

# आरोग्य विभाग(१/४)

(महसुली तरतूद र.रु.२४६.२६ कोटी)

**एम.आर.आय.प्रकल्प -** कै.शिवशंकर पोटे दवाखाना येथे पुणे मनपा व डॉ.कदम डायग्नोस्टिक्स सेंटर यांचे संयुक्त विदयमाने पी.पी.पी.तत्वावर एम.आर.एक्स-रे, सोनोग्राफी, 3.0 Tesla एम.आर.आय.मशिन तसेच सी.जी.एच.एस.दरापेक्षा ५% कमी दराने सेवासुविधा उपलब्ध करण्यात आली.

**एन.आय.सी.यु. -** पुणे महानगरपालिका व मुकुंद माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडिया लिमिटेड यांचे संयुक्त विद्यमाने सी.एस.आर.अंतर्गत भारतरत्न स्व.राजीव गांधी रुग्णालय व कै.चंदुमामा सोनावणे प्रसुतिगृह येथे प्रत्येकी १२ बेड्सची क्षमता असलेले एन.आय.सी.यु. विभाग कार्यान्वित करण्यात आले आहेत.

# आरोग्य विभाग(२/४)

(महसुली तरतूद र.रु.२४६.२६ कोटी)

**डायलेसिस प्रकल्प-** डायलेसिसची आवश्यकता असणा-या रूग्णांकरीता कमला नेहरू रूग्णालय येथे रक्कम रूपये ४००/- (कन्ज्युमेबल्स विना ) इतक्या माफक दरामध्ये रूग्णांना सेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त स्व.राजीव गांधी रूग्णालय, कै.नामदेव शिवरकर दवाखाना, हिंदुह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना या तीन ठिकाणी येत्या कालावधीमध्ये डायलेसिसच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



# आरोग्य विभाग(३/४)

**नेत्रचिकित्सा विषयक सेवासुविधा** - भाउ पाटील रोड, कै.दत्तात्रय वळसे पाटील दवाखाना येथे पुणे मनपा व व्हिजन नेक्स्ट फांउडेशन यांचे संयुक्त विदयमाने पी.पी.पी.तत्वावर नेत्रचिकित्सा विषयक सेवासुविधा माफक दरात चालविण्यास देण्यात आलेल्या आहेत.



**मृत प्राण्यांची शास्त्रीय दृष्ट्या विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने इन्सिनरेटर प्लॅन्ट उभारणे -** जिल्हा नियोजन समितीच्या आर्थिक सहयोगाद्वारे ७०० ते ९०० किलोग्राम क्षमतेचा **इन्सिनरेटर** प्लॅन्ट उभारण्यात आला असून, या व्यतिरिक्त पाळीव मृत कुत्रे / मांजर तसेच मृत भटकी कुत्रे यांची विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र **इन्सिनरेटर** कार्यान्वित करण्यात आला आहे.

# आरोग्य विभाग(४/४)

**ज्येष्ठ नागरीकांची डे-केअर सुविधा -** ज्येष्ठ नागरीक व अतिवृध्द नागरीक यांना आरोग्यविषयक सेवा पुरविण्यासाठी डे-केअर सेंटरच्या धर्तीवर थरकुडे दवाखाना, एरंडवणा येथील जागेत पुणे मनपा  व कर्नल क्युब यांचे संयुक्त विदयमाने ज्येष्ठ नागरीकांना आरोग्य विषयक सेवा पुरविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याच्या हेतूने पी.पी.पी.तत्वावर ५ वर्षे मुदतीच्या कराराने प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.

**जन्मजात कर्णबधिर बालकांचे  बहुआयामी अपंग पुनर्वसन व सर्वांगीण विकासा**साठी निदान, समुपदेशन, प्रशिक्षण, मुलांचा बौध्यांक तपासणे इ. सेवासुविधा बिंदू माधव ठकारे दवाखाना येथे पुणे मनपा व कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग अॅन्ड स्पीच यांचे संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात येणार आहे.

**बर्न पेशंट वॉर्ड -** पुणे मनपाचे कै.चंदुमामा सोनावणे प्रसुतिगृहाचे तीन मजली जुन्या इमारतीमध्ये बर्न व स्ट्रोक वॉर्ड प्रोजेक्ट सुरू करण्यात येणार आहे.

# नगर नियोजन(१/२)

पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट ११ गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया या वित्तीय वर्षात पूर्ण करण्यात येईल.

११ गावांचे सामाजिक, आर्थिक विश्लेषण गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेमार्फत करण्यात येईल.

समाविष्ट ११ गावांचे हद्दी दर्शविणारा नकाशा जाहीर प्रकटनासह प्रसिध्द करणेत आलेला आहे. त्यातूनच विद्यमान जमीन वापर नकाशा पुणे महानगरपालिकेतर्फे तयार करण्यात येत आहे.

मौजे येवलेवाडी गावाचा प्रारूप विकास आराखडा मे. शासनास अंतिम मंजूरीकरीता सादर

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२(क) नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना (कंपाऊंडींग स्ट्रक्चर) म्हणून घोषित केले आणि या वित्तीय वर्षात पूर्ण करण्यात येईल.

# नगर नियोजन (२/२)

पुणे महानगरपालिका मुळ हद्द व समाविष्ट २३ गावे या ठिकाणी नविन टी. पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव आहे.

अमृत योजने अंतर्गत प्रायोगिक तत्वावर देशभरात २५ शहरांची निवड केलेली असून, त्यामध्ये पुणे येथे प्रायोगिक तत्वावरील टी. पी. स्कीमकरीता मे.केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार आहे.

नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी फुरसुंगी व देवाची उरूळी या दोन गावांमध्ये टी.पी. स्कीम राबविण्याचा प्रस्ताव तयार असून या माध्यमातून बाहय वळण रस्त्याची जागा कोणतेही आर्थिक मोबदला न देता ताब्यात मिळणार आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना(१/२)

( तरतूद र.रु.७० कोटी)

प्रधानमंत्री आवास योजना सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही महत्वकांक्षी योजना सुरू केलेली आहे. पुणे शहरातील पात्र लाभार्थ्यांना घरे देण्याचे पुणे महानगरपालिकेचे उद्दिष्ट आहे. या योजनेचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यामधून परवडणा-या घरांची निर्मिती होणार आहे.


पुणे महानगरपालिकेकडून अल्प उत्पन्न गटातील (EWS) सदनिका बांधण्यासाठी हडपसर, खराडी, वडगाव (खुर्द) या परीसरातील एकूण ८ (आठ) सविस्तर प्रकल्प अहवाल मे.शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले असून, त्यामधून प्रत्येकी ३० चौ.मी.पर्यंत क्षेत्रफळाच्या असणारी एकूण ६,२६४ सदनिका उपलब्ध होणार आहेत.

# प्रधानमंत्री आवास योजना(२/२)

सदर ८ प्रकल्पांसाठी एकूण खर्च अंदाजे र.रू.७००.०० कोटी इतका असुन त्यास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी मिळाली आहे. सदर प्रकल्पांच्या बांधकामासाठीची निविदा मागविण्यात आली असून लवकरच बांधकाम सुरू करण्यात येईल.

पात्र अर्जदारांना अर्थसहाय्य व मार्गदर्शनासाठी माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यामध्ये ७५०० कुटुबांनी लाभ घेतला.

त्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत परवडणारी घरे,सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील प्रकल्प आणि कर्ज सलग्न व्याज अनुदान(CLSS) या माध्यमातून अंदाजे २१००० घरकुलांची निर्मिती या वर्षात करण्याचे नियोजन आहे.



# उद्यान विभाग(१/२) भांडवली तरतूद र.रु ९७ .१२ कोटी+महसुली तरतूद र.रु.४३.७२ एकूण र.रु.१४०.८४)

पु.ल.देशपांडे उद्यान, सिंहगड रोड फेज-३ येथे दिल्ली हटच्या धर्तीवर कलाग्राम या वर्षात विकसीत करणे

तळजाई टेकडी येथे ११० एकर क्षेत्रावर नियोजीत जैवविविधता उद्यान विकसीत करणे

सुगम्य भारत योजने अंतर्गत शहरातील विविध उद्यानांमध्ये दिव्यांग व्यक्तिंकरीता स्वच्छतागृह बांधणे व इतर सोयीसुविधा निर्माण करणेचे कामाला गती देणार.



# उद्यान विभाग(२/२)

तुकाई माता उद्यान, हिंगणे खु. येथे लिली पार्क आणि रॉक गार्डन तयार करणे.


वडगाव शेरी येथे  “Barrier Free Access” या संकल्पनेवर आधारीत दिव्यांगांकरीता अडथळा विरहीत उद्यान विकसीत करणे


कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान,डहाणूकर कॉलनी,कोथरूड येथे “Talking Trees”या संकल्पनेवर आधारीत उद्यान विकसीत करण्याचे प्रस्तावित असून, यामध्ये श्रव्य माध्यमातून झाडे स्वत:विषयी बोलणार आहे.



# विद्युत विभाग(१/२)

**भांडवली तरतूद र.रु १०६.३८ कोटी+महसुली तरतूद र.रु.२२२.९१ एकूण र.रु.३२९.३७)**








**एल.ई.डी दिवे बसविण्याचा प्रकल्पांतर्गत** डिसेंबर २०१८ अखेर शहरातील विविध रस्त्यांवर ८५३८५ एल.ई.डी दिवे बसविण्यात आले, त्यानुसार नोव्हेंबर २०१८ अखेर ३.९४ कोटी युनिटचे एनर्जी सेव्हिंग झालेले असुन ठेकेदारांकडून १२ वर्षे देखभाल व दुरूस्ती करून घेण्यात येणार आहे.

पुणे महानगरपालिकेच्या ९ इमारतींवर रूफ टॉप सोलर सिस्टिम रेस्को मॉडेल द्वारे ४३३ किलो वॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला असून ३४ इमारतींवर रूफ टॉप सोलर सिस्टिम कॅपेक्स मॉडेल द्वारे ८२५ किलो वॅट असे एकूण १.२५ MW क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर

# विद्युत विभाग(२/२)





केंद्र शासनाच्या धोरणानुसार Energy Efficiency Services Ltd (EESL) मार्फत शहरातील प्रकाशव्यवस्थेमध्ये उर्वरीत ५१५००एल.ई.डी दिवे बसविणे नियोजन

पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गांवामध्ये प्रकाशव्यवस्था करणे.

# स्मार्ट सिटी अभियान

(तरतूद रु.५०कोटी)

स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा रु.५०.००कोटी इतकी तरतुद अनुदान म्हणून प्रस्तावित.

पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे मार्फत औंध,बाणेर,बालेवाडी या क्षेत्राच्या विकासासाठी तसेच संपूर्ण शहरासाठी विविध प्रकल्प राबविणे.

औंध,बाणेर,बालेवाडी या क्षेत्रामध्ये उर्वरीत रस्त्याचे पथदर्शी पुनर्रेखन काम करणे व नविन २५ कि.मी.पथ निर्मिती करणे.

प्लेसमेकिंग अंतर्गत स्थानिक नागरिकांसाठी विविध पडीक जमिनींचा व मोकळया जागांचा वापर करणे.

प्रसूतिगृह ,महिलांसाठी व्यायाम शाळा, वृद्ध व महिलांकरिता सामुदायिक हॉल इत्यादी सुविधा उपलब्ध करून देणे.

रिअल टाइम ट्रॅफिक डिमान्डचे व्यवस्थापन करण्यासाठी तसेच ट्रॅफिकच्या नियमांचे पालन करण्यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुण्याकरीता ॲडाप्टिव्ह ट्रॅफिक कंट्रोल सिस्टिम / प्रणाली विकसित करणे.

# भवन रचना(१/२)

**भांडवली तरतूद र.रु ३६३.०२ कोटी+महसुली तरतूद र.रु.४०.४८ एकूण र.रु.४०३.५० कोटी)**

पुणे शहरात ७ नविन लाईट हाऊस सुरु करणे, या संकल्पनेतुन झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या युवकांना प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध करणे.

वारजे येथे युथ गाईड्स सेंटर सह लाईट हाऊस उभारणे.

घोले रोड येथे पुणे शहराची अद्यावत सिटी लायब्ररीची उभारणी करणे.

नविन ७ लोकेशनवर प्लेसमेकिंगचे काम पूर्ण करणे.

बावधन येथे नविन फायर स्टेशन व ट्रेनिंग सेंटर प्रस्तावित.

हडपसर येथील फायर स्टेशनचे काम पूर्ण करणे.

सिंहगड किल्ल्यावरील स्वराज्य निष्ठ शिल्प उभारणीची कामे पूर्ण करणे.

# भवन रचना(२/२)

बाणेर येथे आर.के.लक्ष्मण यांच्या नावाने कलादालन पूर्ण करणे.

येरवडा येथील रामभाऊ  मोझे शाळेची धोकादायक इमारत पाडून नव्याने बांधकाम करणे.

कोथरूड येथे एक्झिबिशन सेंटरची उभारणी करणेत येणार आहे.

हडपसर येथे राजर्षी शाहु संकुलामधील कै.विठ्ठलराव तुपे नाटयगृहाचे काम पूर्ण करणेत येणार आहे.

नगर रोड येथील क्षेत्रिय कार्यालयाची इमारत पुर्ण करणेत येणार पूर्ण करणेत येणार आहे.

वानवडी येथील महादजी शिंदे शाळा जुनी इमारत पाडुन ई-लर्निंग शाळा बांधून पूर्ण करणे

कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणे कामाला प्राथमिकतावर गती देणे

# हेरीटेज सेल

( तरतूद र.रु.१०.८८ कोटी)

पुणे शहरातील हेरिटेज स्ट्रक्चरबाबत सुरक्षा व स्वच्छता विषयक कामे करणे.

नानावाडा येथील पेशवेकालीन व दगडी इमारतीची उर्वरीत टप्प्यातील जतन संवर्धनाची कामे करणे.

महात्मा फुले मंडई येथील जतन संवर्धनाची कामे करणे.

पुणे शहरात विविध प्रकारचे हेरीटेज वॉक, मिनी बस टूर विकसित करणे.

विश्रामबागवाडा येथील धोकादायक वास्तुची जतन संवर्धनाची कामे करणे व पुनवडी ते पुण्यनगरी या प्रदर्शनाचे नुतनीकरण करणे.

नानावाडा येथील पेशवेकालीन दरबार हॉल येथे नाना फडणवीस यांच्या जीवनावर आधारीत प्रदर्शन उभारणे.

नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतिकारकांच्या जीवनचरीत्रावर आधारीत कायमस्वरूपी संग्रहालय उभारणे.

# गुणवत्तापरक शिक्षण

(प्राथमिक र.रु ३२९.२० कोटी)

५ इमारतींमधून **PMC Models of Excellence** प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये Building As Learning Aid (BALA) धर्तीवर इमारतीमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या प्रकल्पांतर्गत रोबोटीक लॅब व म्युजिक रुम विकसीत करण्यात येणार असून शिक्षकांची अध्यापन पध्दतीमधील क्षमतावाढ करण्यात येणार आहे.

बीएसएनएल मार्फत राबविण्यात येत असलेल्या ई-लर्निंग प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, त्यामध्ये प्राथमिक शिक्षण विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयात एक व्हर्च्युअल स्टुडिओ, ५० इमारतींमधून ५० व्हर्च्युअल क्लासरुम्स व ३०० डिजिटल क्लासरुमचे काम पूर्ण

ई-लर्निंग प्रकल्पांतर्गत उर्वरीत १०० इमारतींमधून १०० व्हर्च्युअल क्लासरुम्स व २०० शाळांमधून ६०० डिजिटल क्लासरुमचे काम पूर्ण करण्यात येणार

प्राथमिक शिक्षण विभागाकडील सुमारे ९१,७०० विद्यार्थ्यांच्या / आई वडिलांच्या बँक खात्यामध्ये विविध योजनांसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणाली मार्फत रक्कम जमा करण्यात आली

प्रशासकीय सुधारणा म्हणून ४५०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे दरमहाचे वेतन संगणक प्रणालीद्वारे करण्यात आले

विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सहयोगी दल व तदनुषंगिक शैक्षणिक उपक्रमांद्वारे नाविण्यपूर्ण योजना राबविणे प्रस्तावित

या आर्थिक वर्षामध्ये विद्यार्थांच्या सहली, स्नेहसंमेलन इत्यादी उपक्रमांचे आयोजन करणेत येत आहे

# माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग

(माध्यमिक शिक्षण र.रु.५५.०९ कोटी)

सी.एस.आर अंतर्गत स्टेप – अप फौंडेशन तर्फे विविध शाळांमध्ये जीवनमुल्य शिक्षण (समुपदेशन) प्रकल्प तसेच सलाम बॉम्बे फौंडेशन तर्फे व्यवसायाभिमुख कौशल प्रशिक्षण व तंबाखू मुक्त शाळा उपक्रम राबविण्यात येत आहे.

NSQF (National Skill Qualification Framework) अंतर्गत पुणे महानगरपालिका संचलित १७ माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण देण्याचे नियोजन आहे.

सन २०१८-१९ मध्ये राबविण्यात आलेल्या मोफत पाठयपुस्तके व गणवेश, मोफत बस पास सुविधा, मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना, NSQF (National Skill Qualification Framework) योजना, सॅनिटरी नॅपकिन, ११वी व १२वी द्विलक्षी अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सी.एम.आर अंतर्गत उपक्रम सन २०१९-२० मध्येही राबविण्यात येतील व त्यामध्ये अधिक सुधारणा व सुसूत्रता करण्यात येत आहेत.

# समाज विकास विभाग

( तरतूद र.रु.९३.७० कोटी)

दिव्यांगांसाठी महत्वाच्या स्थानिक बस स्टॉप / डेपोमध्ये व्हिलचेअर उपलब्ध करणे.

अंध व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी सुरू  करणे.

दिव्यांगांसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन व व्यायाम शाळा सुरू करणे.

दिव्यांगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रचार / प्रसार करणे.

मनपा इमारती, सभागृह, कार्यालय या ठिकाणी दिव्यांगांसाठी पायाभुत सुविधा उपलब्ध करून देणे.

# मागील चार वर्षांचा अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

# मागील ४ वर्षांचा संक्षिप्त आढावा : जमा बाजू

(आकडे रुपये कोटीत )

| जमा बाजू | डिसेंबर २०१५ अखेर | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ११३४.८३ | १०५१.७४ | ६३५.६६ | ७३.४३ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ०.०० | ०.०० | ८२३.८० | ११७९.५४ |
| मिळकत कर | ५६९.७८ | ८९८.६० | ६०७.४७ | ७५०.४१ |
| पाणीपट्टी | १३९.७२ | ३५.४९ | १४९.५६ | १९७.४३ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ५७५.०८ | ४०२.०५ | ३२९.१२ | ५५९.८७ |
| इतर जमा | ४८०.२३ | २१७.८७ | २९८.३६ | १९४.४७ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ०.०० | ०.०० | ३९.९० | ०.३० |
| शासकीय अनुदान | ३३.४४ | १२.४१ | ७९.३९ | ९९.०२ |
| कर्ज / कर्ज रोखे | ०.०० | ०.०० | २००.०० | - |
| PMAY | - | - | - | ०.०३ |
| **एकूण रक्कम रु.** | **२९३३.०८** | **२६१८.७४** | **३१६३.१६** | **३०५४.५०** |

# मागील ४ वर्षांचा संक्षिप्त आढावा : खर्च बाजू

(आकडे रुपये कोटीत )

| खर्च बाजू | डिसेंबर २०१५ अखेर | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ८०२.०३ | ८५०.८६ | ११६३.२७ | १०८१.०५ |
| वीज खर्च व दुरुस्ती | ८०.४६ | १११.०६ | १४३.५१ | १४९.८६ |
| पाणी खर्च | १२.०९ | ७.५७ | १३.९८ | ५६.९४ |
| कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ३९.८४ | ३५.५१ | १२.७१ | २१.०६ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ५३.६३ | ६९.७० | ६०.३५ | ७४.४२ |
| देखभाल दुरुस्ती व इतरखर्च | २९५.२६ | २८७.१३ | ३०९.३५ | ३७६.६५ |
| वार्डस्तरीय कामे | २.२२ | ४.४२ | १.३३ | ४.४२ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ६.११ | १८.४३ | ०.४० | ५.८६ |
| भांडवली व विकासाची कामे | ५२९.७७ | ४९८.३५ | ५३२.२३ | ४३५.०१ |
| स्मार्ट सिटी व अमृत योजना | ९१.५५ | ५१.८४ | ६५.०३ | ३२.९१ |
| **एकूण रक्कम रुपये** | **१९१२.९६** | **१९३४.८७** | **२३०२.१६** | **२२३८.१८** |

# सन २०१९-२० चे वार्षिक अंदाज पत्रक


# सन २०१९-२० आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज

(आकडे रुपये कोटीत )


सन २०१९ -२० या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १६६५.०० |
| स्थनिक संस्था कर | १९९.१५ | वीज खर्च व दुरुस्ती | २५५.०१ |
| वस्तू आणि सेवा कर(GST) | १८०१.०० | पाणी खर्च | १७०.०० |
| मिळकतकर | १७२१.८७ | कर्ज परत फेड, व्याज व घसारा | ९१.६१ |
| विकास शुल्क | ७९९.६६ | औषधे, पेट्रोल/ डिझेल | ११०.४२ |
| पाणी पट्टी | ४५७.३५ | देखभाल दुरुस्ती व इतर खर्च | ११२६.१५ |
| शासकीय अनुदान | २५३.४५ | वॉर्डस्तरीय | ३४.४० |
| इतर जमा | ६०२.५० | क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ८२.४० |
| कर्ज /रोखे | २००.०० | भांडवली व विकासाची कामे | २३८१.११ |
| प्रधानमंत्री आवास योजना | ५०.०० | अमृत व स्मार्ट सिटी अभियान | १६८.८८ |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| एकूण | ६०८५.०० | एकूण | ६०८५.०० |

# रुपया असा येणार - सन २०१९-२०चे अंदाजपत्रक (र.रु ६०८५ कोटी)



# रुपया असा जाणार - सन २०१९-२०चे अंदाजपत्रक (र.रु ६०८५ कोटी)




# वित्तीय व्यवस्थापन विश्लेषण (वार्षिक अंदाजपत्रक र.रु.६०८५.०० कोटी)

१. महसुली खर्च – र.रु.३५३५ कोटी

सेवकवर्ग खर्च १६६५ कोटी (४७% ) अंतर्भूत

२. भांडवली खर्च – र.रु.२५५०कोटी


## वार्षिक अंदाजपत्रक विश्लेषण



# नव्याने समाविष्ट ११ गावांचे आर्थिक विश्लेषण

| अ.क्र | विभागाचे नाव | अंदाज (र.रु.कोटीत) |
|---|---|---|
| | **भांडवली खर्च** | |
| १ | पथ | ४५.२१ |
| २ | पाणीपुरवठा | ३३.९७ |
| ३ | ड्रेनेज | २५.१८ |
| ४ | बांधकाम | ५.०६ |
| ५ | घनकचरा | ३.३० |
| ६ | विद्युत | २.१० |
| | **एकूण भांडवली खर्च** | **११४.८२** |
| | **महसुली खर्च** | |
| १ | सेवकवर्ग | १८.०० |
| २ | विभागीय कार्यालय | ५.५० |
| | **एकूण महसुली खर्च** | **२३.५०** |
| | **एकूण(भांडवली खर्च + महसुली खर्च)** | **१३८.३२** |

- सन २०१९-२० मध्ये मिळकत कर द्वारे अंदाजित उत्पन्न **र.रु.६९कोटी**



# पुरस्कार / यश (१/३ )

## इंडिया स्मार्ट सिटी पुरस्कार -

Ministry of Housing and Urban Affair, भारत सरकार यांचे मार्फत "भारत स्मार्ट शहर पुरस्कार-२०१८" अंतर्गत २७ जूलै २०१८ रोजी लखनौ येथे तिसऱ्या वर्धापन दिन साजरा करण्यात आला

त्यामध्ये लाइट हाऊस प्रोजेक्ट, पब्लिक बाईक शेअरिंग आणि प्लेस मेकिंग प्रोजेक्ट आणि भारतातील सर्वात मोठे महापालिका बॉंडसाठी प्रोत्साहन निधी र.रु.२६ कोटी , पुरस्कार पुणे महानगरपालिकेला प्राप्त झाला आहे.

## हुडको पुरस्कार –

पुणे महानगरपालिकेला "पीपीपी अंतर्गत पुणे स्ट्रीट लाइट प्रोजेक्ट" साठी हुडको बेस्ट प्रॅक्टिस पुरस्कार २०१७-१८ प्राप्त झाला आहे.

तसेच पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम अंतर्गत जे.एम रोडचे नूतनीकरणासाठी प्रशंसा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.





पंतप्रधान मोदींच्या हस्ते पालिकेचा गौरव



# पुरस्कार / यश (२/३ )







**“राहण्यायोग्य सर्वोत्तम शहर"(इज ऑफ लिव्हिंग इनडेक्स) म्हणून पुण्याचा प्रथम क्रमांक**

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने राहण्यायोग्य सर्वोत्तम शहरासाठी ओळखल्या जाणाऱ्या स्मार्ट सिटीसह १११ भारतीय शहरांचे मूल्यांकन ७८ संकेतकांमधील संस्था आणि प्रशासन, सामाजिक पायाभूत सुविधा (शिक्षण/ आरोग्य), आर्थिक आणि भौतिक संरचना या ४ घटकामध्ये केला असून पुण्याला **प्रथम क्रमांक मिळाला.**

## स्कॉच पुरस्कार

पुणे महानगरपालिकेला १६ प्रकल्पांसाठी डिजीटल, आर्थिक, सामाजिक समावेशन, शहरी स्वच्छता, सर्वोत्तम शासन, समावेशक विकास, तंत्रज्ञानातील उत्कृष्टता आणि अनुप्रयोग, शिक्षा, नागरिक सेवा वितरण, या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट प्रयत्नांसाठी स्कॉच पुरस्कार ऑफ मेरिट प्राप्त झाले आहेत.


PMC wins laurels at SKOCH awards

# पुरस्कार / यश (३/३ )

**जनाग्रह पुरस्कार**

-जनाग्रह संस्थे (सेंटर फॉर सिटीजनशिप अ‍ॅण्ड डेमोक्रेसी) द्वारे **अ‍ॅन्युअल सर्वे ऑफ इंडियाज सिटी-सिस्टम्स (ASICS)** अहवालाचे ५ व्या आवृत्तीचे प्रकाशन केले. शहरी भागात प्रशासनात गुणवत्ता ठरविणारा हा अभ्यास २०१७ च्या अंकात भारतातील २० राज्यांमध्ये २३ प्रमुख शहरांना ८९ प्रश्नांच्या आधारे समावेश करण्यात आला आहे.

- ASICS सर्व्हे द्वारे स्थानिक योजना आणि डिझाइन मानक, स्थानिक स्वराज्य संस्था वित्त आणि कर्मचारी, शहर पातळीवरील राजकीय नेतृत्व आणि पारदर्शकता आणि नागरिक सहभागाचे "शहर-सिस्टम" चे मूल्यांकन करून दीर्घकालीन पायाभूत सुविधा आणि सेवा प्रदान करण्यासाठी शहरांचे मुल्यांकन केले जाते. पुण्याने पहिल्यांदाच 10 पैकी 5.1 गुणसंख्या मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. ५ टॉप शहरांमध्ये कोलकाता, तिरुवनंतपुरम, भुवनेश्वर आणि सुरत यांचा समावेश आहे.

**क्लायमेट चेंज अँड क्लीन एअर २०१८ चा प्रतिष्ठेचा पुरस्कार**

–सन फ्रान्सिस्को येथे आयोजित समारंभात वायूप्रदूषण व कचरा व्यवस्थापन या क्षेत्रात पुणे महापालिकेने उल्लेखनीय कामे केल्याबद्दल युनायटेड नेशन एन्व्हॉमेंट प्रोग्रॅम या अमेरिकन संस्थेने पुणे महानगरपालिकेस पुरस्कार दिला.

हे अंदाजपत्रक सादर करताना

आपणा सर्वांकडून

मिळालेल्या बहुमोल

सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार